# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान
## राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा)

युनिट क्र. ७, १९ वा माळा, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१,
कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

ई-मेल- spdrusamah@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२१६०९४३/५९

मनीषा वर्मा, भा.प्र.से.
संचालक


---

क्रमांक- प्रसं/रुसा/आदेश/१५-१६/१०१ दिनांक- /०३/२०१६

कार्यालयीन मंजूरी आदेश

**विषय :-** राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा ) या योजनेअंतर्गत प्राप्त निधी वाटपास व करावयाच्या कामांना मंजूरी देणेबाबत.

**संदर्भ :-** १) केंद्र शासनाचे पत्र क्र. F No. २४-३७/२०१४-U.Policy(MHIGUIGC-Gen/SC/ST) dated २९ Sept. २०१५.

२) केंद्र शासनाचे पत्र क्र. F No. २४-३७/२०१४-U.Policy(MHIGUIGC-Gen/SC/ST) dated ३० डिसेंबर २०१५.

३) शासन पत्र क्र. रुसायो-२०१६/(१९८/१६)मशि-४, दि. ३० मार्च २०१६.

**प्रस्तावना -**

राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा ) अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या रुपये २५१ कोटीच्या आराखडयास दि. ०२ सप्टेंबर २०१५ च्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरी मिळालेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ९ विद्यापीठे (मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी महिला विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठ, जळगाव विद्यापीठ) यांचा समावेश आहे. या सर्व संस्थांना घटक क्रमांक ३ (Infrastructure Grants to University) या अंतर्गत प्रत्येक विद्यापीठाला २० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संबंधित विद्यापीठांनी त्यांच्या कामाचा कृती आराखडा व कामांचे प्राधान्यक्रम संचालनालयाला सादर केले आहेत. या प्राधान्यक्रमाने करावयाच्या कामांची छाननी संचालनालय स्तरावर करण्यात आली असून केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याच्या प्रमाणात उपलब्ध झालेला निधी संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करण्याची व प्राधान्यक्रमाने करावयाच्या कामांना मंजूरी देण्याची बाब विचाराधीन होती. त्याचप्रमाणे घटक क्र. ८ (संशोधन व नाविण्यपूर्ण उपक्रम ) यासाठी रुपये २० कोटी इतका निधी ७ विद्यापीठासाठी मंजूर करण्यात आला असून त्याचे वितरण करण्याची बाब सुध्दा विचाराधीन होती.

**आदेश -**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करण्यात आलेल्या रुपये **३,०७,७१,४२९/-** लक्ष इतक्या निधीच्या प्रमाणात प्राधान्यक्रमाने करावयाच्या खरेदीच्या कामांना सोबतच्या परिशिष्टानुसार व खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांना मंजूरी देण्यात येत आहे.

१) परिशिष्टामध्ये नमुद करण्यात आलेल्या बांधकाम व नुतनीकरण कामांना आपल्या स्तरावर तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी प्रदान करावी.

२) खरेदी करावयाच्या कामांना विद्यापीठांनी आवश्यकतेनुसार तांत्रिक मंजूरी प्रदान करावी.

३) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत अकृषी विद्यापीठांनी प्रदान केलेल्या तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीच्या बांधकामांची त्यांच्या विहित नियमानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी ही सद्यस्थिती विद्यापीठनिहाय प्रचलित कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अथवा स्वत:च्या अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात यावी.

४) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत सर्व अकृषी विद्यापीठांनी वित्तीय अधिकार त्यांच्या विद्यापीठ लेखा संहितेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत वापरावी. तसेच शासनाने उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ३०/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदरची खरेदी प्रक्रिया विद्यापीठांनी आपल्या स्ततावर पार पाडावी. या संदर्भातील सर्व प्रचलित अटी व शर्तीचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यापीठाची राहिल.

५) बांधकाम, नुतनीकरण किंवा खरेदी करण्यात येणाऱ्या प्रत्येक बाबीवर राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान ( रुसा ) योजनेचा लोगो स्वंतत्र रित्या प्रथम दर्शनी दिसेल अशा स्वरुपात लावणे अनिवार्य आहे.

६) विद्यापीठांनी विहित कालावधीमध्ये वितरीत करण्यात आलेला खर्च पुर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. विद्यापीटांने ज्या उद्दिष्ठासाठी मंजूर केलेल्या अनुदानाचा वापर त्याच उद्दिष्टासाठी करावा आणि त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र (Utilization Cartificate ) केंद्र शासनाच्या विहित नमुन्यामध्ये प्रकल्प संचालनालयास वेळेत सादर करणे बंधनकारक आहे.

७) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत घेण्यात आलेल्या कांमांचे संनियंत्रण खालील नमुद केलेली प्रकल्प सनियंत्रण समिती करेल.

१) कुलगुरु - समितीचे अध्यक्ष

२) कुलसचिव - सदस्य सचिव

३) संचालक, महाविद्यालये व विद्यापीठे विकास मंडळ व किंवा संबंधित विभागाचे अधिष्ठाता

४) वित्त व लेखा अधिकारी- सदस्य

५) विद्यापीठ अभियंता - सदस्य

६) वास्तुविशारद

७) रुसा समन्वयक

८) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राप्त निधीचे लेखापरिक्षण करुन अहवालाची प्रत प्रत्येक वर्षी रुसा कार्यालयास पाठविण्यात यावी. तसेच रोख वही स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

९) विद्यापीठांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरिक्षण अहवाल इ. संबंधित अधिकाऱ्यांना तपासणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

१०) **संशोधन व नाविण्यपूर्ण उपक्रम यासाठी वितरीत करण्यात आलेला निधी त्याबाबतचा आराखडा, आखणी व अमंलबजावणी करण्याचा निर्णय सर्व भागीदार विद्यापीठांच्या मध्ये होईपर्यंत खर्च करण्यात येवू नये.**

११) विद्यापीठांनी पुरवठादारास/ कंत्राटदारास त्यांना अदा करावयाची देयकाची रक्कम RTGS द्वारे त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावी.

१२) **परिशिष्टामध्ये दिलेल्या कामांची रक्कम वितरीत करण्यात आलेल्या तरतुदीपेक्षा जादा असल्यास मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीच्या मर्यादेपर्यंत नविन बांधकामे / खरेदी / नुतनीकरण करण्यात यावीत.**

१२) या आदेशान्वये रुपये **३,०७,७१,४२९/-** इतका निधी RTGS द्वारे विद्यापीठाच्या रुसा बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.

(स्थळ प्रत मा. प्रकल्प संचालक यांनी मान्य केली आहे.)

सहसंचालक
राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा)

प्रति-

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
५) महालेखापाल, (लेखा व परिक्षण)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
६) सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर
७) उपसंचालक (वित्त), राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान
८) निवड नस्ती (रुसा)

## परिशिष्ट

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### अ. नुतनीकरण करावयाच्या साहित्याची यादी

| Sr. No. | Head | Description of Item | No. | Cost. |
|---|---|---|---|---|
| 1 | **Rennovation/Upgradation** | Renovation of Boys Hostel | 50 | 2,63,78,000 |
| | | Renovation / upgradation of laboratories, auditoriums & classroom at P.G. depts. | 40 | |
| | | Upgradation of solar systems in campus | 01 | |
| | **Total (Rupees Two Crore Sixty Three Lakhs Seventy Eight Thousand Only)** | | | **2,63,78,000** |

### ब. संशोधन व नाविण्यपूर्ण उपक्रम

| Sr. No. | Head | Description of Project | Cost. |
|---|---|---|---|
| 1 | **Research & Inovation** | **Pharmacutical Technology, Green Chemistry** | **85,71,429** |

राज्य प्रकल्प संचालनालय- मुंबई